# SPANDAN CAREER INSTITUTE

THE WAY OF SUCCESS…

**A**

SPANDAN Career Institute — The way of success... SINCE 2008

**प्रश्नपुस्तिका क्र.**
**BOOKLET No.** **CS2021**


**Total Que. : 80**
**Marks : 200**
**Time : 120 min**

**Mob. No. 9923262977**
**Date :26/12/2021**

**राज्यसेवा (पूर्व) सराव परिक्षा - 2021**
**विषय : — C-SAT[022]**
**पेपर क्र. (५५५)**

**सूचना**

१. सदर प्रश्नपुस्तिकेत ८० अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरूवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका पर्यवेक्षकाकडून लगेच बदलू




२. आपला परीक्षा—क्रमांक हया चौकोनांत न विसरता बॉलपेनने लिहावा.

३. वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

४. अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला ४ पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना १,२,३ आणि ४ असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवर सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करतांना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी.

५. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. अशा प्रकारे प्रश्न सोडविणे सोयीस्कर आहे; पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नाकडे परतणे सोईस्कर ठरेल.

६. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

७. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या **प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक तृतीयांश गुण वजा करण्यात येतील**.

**Note : Test Series Paper Online available**

**Visit us**

**प्रश्न क्रमांक १ ते ४ : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

दुनिया पैदा करावी अशी ब्रम्हदेवाला इच्छा झाली. त्याप्रमाणे आता घडण व्हावयाची. इतक्यात त्याच्या मनात काय झाले कोण जाणे, त्याला वाटले, ''आपल्या कामातील बरेबाईट सांगणारा कोणीतरी असला तर मोठी मौज होईल.'' त्यामुळे आधी त्याने एक चांगला तरबेज टीकाकार बनविला. 'ह्यापुढे मी जे काय घडून काढीन त्याची तपासणी करण्याचे काम तुझे'' असा त्या टीकाकारास अखत्यार देण्यात आला. इतकी तयारी झाल्यावर ब्रम्हदेवाने आपल्या कायखाना चालू केला. ब्रम्हदेव एक एक चीज बनवीत गेला आणि टीकाकार तिच्यातील चूक दाखवून आपल्या जन्माचे चीज करू लागला. टीकाकाराच्या चाचणीपुढे बिनचूक म्हणून काही निघेच ना. ''हत्तीला वर पाहता येत नाही. उंच वरच पाहतो. गाढवात चपळपणा नाही. माकड अचपळ'' अशा रीतीने ब्रम्हदेवाची अक्कल गुंग झाली. तरी त्याने शेवटचा प्रयत्न करून पाहण्याचे ठवरविले आणि कामगिरीची कमाल करून 'माणूस' घडून काढला. टीकाकार निरखून पाहू लागला. अखेर चूक निघालीच ''ह्याच्या छातील एक खिडकी पाहिले होती, म्हणजे ह्याचे विचार सगळयांना समजले असते.'' ब्रम्हदेव म्हणाला, ''तुला बनविले हीच माझी एक चूक आहे. आता मी तुला शंकराच्या ताब्यात देतो.'' ही एक जुनी गोष्ट कुठेशी वाचलेली आहे. तिच्याविषयी शंका घेण्याला फक्त एकच जागा आहे. ती ही की, गोष्टीत सांगितल्याप्रमाणे हे टीकाकार शंकराच्या ताब्यात गेलेले दिसत नाहीत. कदाचित ब्रम्हदेवाला त्याची दया आली असेल किंवा शंकराने आपली शक्ती त्यांच्यावर चालविली नसेल. कसेही असले तरी त्यांची जात आज बरीच फैलावली आहे एवढे मात्र खरे. गुलामगिरीच्या काळात कर्तुत्व न उरल्यामुळे वक्तृत्वाला संधी सापडते. कामाचे बोलणे खुंटले की बोलण्याचेच काम ! आणि बोलायला तरी रोज रोज नवीन विषय कोठून काढायचे ? त्यामुळे एक सनातन विषय ठरवून टाकला ''निंदास्तुती जनांच्या ! वार्ता वधू–धनांच्या'' पण निंदा स्तुती म्हटले तरी त्यात वाटणी समजावयाची आहे. निंदा म्हणजे पर निंदा आणि स्तुती म्हणजे आत्मस्तुती ब्रम्हदेवाने टीकाकाराला बरेवाईट पाहावयाला सांगितले होते. त्याने स्वत:चे बरे पाहिले व ब्रम्हदेवाचे वाईट पाहिले. मनुष्याच्या मनाची ठेवणच अशी चमत्कारिक आहे, की दुसऱ्याचे दोष जसे त्याला ठळठळीत दिसतात तसे गुण दिसत नाही. संस्कृतात 'विश्व गुणादर्श–चंपू' म्हणून एक काव्य आहे. वेंकटाध्वरी नावाच्या एका दाक्षिणात्य पंडिताने ते लिहिले आहे. त्या काव्याची कल्पना अशी आहे की कृशानू दोष–दृष्टी आहे, विश्वावसू गुणग्राहक आहे. दोघे आपापल्या दृष्टीने वर्णन करीत आहेत. 'गुणदर्श' म्हणजे 'गुणांचा आरसा' असे काव्याचे नाव ठेवून कवीने आपले निर्णायक मत' विश्वावसूच्या बाजूला दिले आहे. तर एकंदर वर्णनाची धाटणी अशा थाटाची झाली आहे की, शेवटी वाचकांच्या मनावर कृशानूच्या मताचीच छाप पडते. गुण घेण्याच्या इराद्याने लिहिले तरी ही दशा, मग दोष पाहण्याची वृत्ती असती तर काय झाल असते ?

१. टीकाकार तयार केला ही आपली चूक झाली असे ब्रम्हदेवाला वाटले. कारण .............

१) टीकाकाराने त्याच्यावर सोपविलेले काम केले नाही.

२) टीकाकाराने विविध प्राण्यातील फक्त दोष दाखविले.

३) टिकाकाराच्या चाचण्या फार कडक होत्या.

४) प्राणी निर्माण करण्याच्या ब्रम्हदेवाच्या योजनेला टीकाकाराने विरोध केला.

---

२. 'टीकाकारांची संख्या आज वाढली आहे' असे कशावरून म्हणता येईल ?

१) आज टीकाकारांच्या कामाला महत्व आले. २) ब्रम्हदेवाने टीकाकारांना प्रोत्साहन दिले.

३) शंकराने टीकाकाराला ताब्यात घेतले नाही. ४) दोषदिग्दर्शनाची प्रवृत्ती वाढली आहे.

---

३. 'विश्वगुणादर्शचंपू' या काव्याचा परिणाम कोणत्या विधानातून यथार्थपणे व्यक्त होतो ?

१) मानवी आदर्शा चे चित्र भुरळ पाडते. २) जीवनातील दोष लक्षात येतात.

३) जगातील सौंदर्य जाणवते. ४) जगातील गुणांचे महत्व ध्यानी येते.

---

४. प्रस्तुत उताऱ्यातून कोणती मानवीपवृत्ती प्रकट होते ?

१) स्पष्टवक्तेपणा २) गुणग्राहकता ३) दोष पाहणारी वृत्ती ४) आज्ञाधारकपणा

---

**प्रश्न क्रमांक ५ ते ८ : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे घ्या.**

भारतीय कुंटुंबव्यवस्थेची मोठी शोकांतिका म्हणजे आजही स्त्रियांचा छळ भारतीय समाज रचनेतील स्त्रीचं दुय्यमत्व, पारंपारिक विचारांच्या पगडयातून न झालेली सुटका, आर्थिक असमानता यामुळे निर्माण झालेल्या या हुंडयाची समस्या कायमस्वरूपी नष्ट व्हावी या हेतूने १९६१ मध्ये म्हणजे ५६ वर्षा पूर्वी हुंडा प्रतिबंध कायदा करण्यात येऊन हुंडयासाठी बळी घेणाऱ्या व्यक्तीला फाशीसारखी शिक्षाही सुनावली गेली, पण या समस्येची दाहकता कमी झाली नाही. परिणाम 'हुंडा' या शब्दाची व्याप्ती वाढवून स्त्रियांना संरक्षण देणारे विविध हुंडाविरोधी कायदे करण्यात आले तरीही कायद्याचा धाक बसण्याऐवजी त्यातील पळवाटांमुळे त्याची धार कमी होत गेली, दरवर्षी हुंडयाप्रकरणी दाखल होणाऱ्या तक्रारींच्या संख्येवर नजर टाकली तर त्याची आकडेवारी चिंता वाढवणारी आहे, पण त्यातील भीतीदायक गोष्ट म्हणजे त्यातील शिक्षेचे अत्यल्प प्रमाण, गुन्हा नोंदवलाच जात नाही किंवा मागे घेतला जात असल्याने या प्रकरणातील आरोपींना मोकळं रान मिळतं, लग्नाच्या बाजारात अनेक मागण्या वधुपक्षाकडून पूर्ण झाल्या नाहीत वा मनासारखे मानपान झाले नाही. तर विवाहितेचा विविध प्रकारे छळ केला जातो. तिला ठार केलं जातं वा तिला आत्महत्येसाठी प्रवृत्त केलं जातं, अगदी आजही, स्वत:ला पुरोगामी म्हणवणारा महाराष्ट्रही शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमागे मुलींच्या लग्नात करावा लागणारा खर्च हाही कारणीभूत ठरलेला आहे. दुष्काळग्रस्त भागात कमाईच नाही तर लग्न तरी कशी पार पाडणार? पण ग्रामीण भागातच नव्हे तर मुंबई पुण्यासारख्या शहरी भागातही हुंडाबळी जाण्याचे, सासरच्या मंडळींकडून हुंडयासाठी छळ करण्याच्या तक्रारींचे चढे प्रमाण या समस्येप्रतिची समाजाची मानसिकता आणि उदासीनता अधोरेखित करते. 'नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरो' च्या २०१६ च्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अहवलाले तर त्यावर शिक्कामोर्तब केले अहो. एवढया वर्षाच्या प्रयत्नांनंतरही या प्रश्नावर समाज इतका उदासीन का ? पोलीस ठाण्यात वा न्यायालयात पोहोचलेली ही प्रकरणे पूर्णत्वास का जात नाहीत, त्यातील शिक्षेचे प्रमाण कमी असण्याचे आणि दिवसेंदिवस ते घटत जाण्याची नेमकी काय जात आहे

का, की पळवाटा शोधल्या जातात ? हुंडा प्रतिबंधक कायद्यांतर्गत पती वा त्याच्या नोतेबाईकांकडून अत्याचार केल्याच्या तक्रारी स्त्रियांकडून नोंदवल्या जातात. मात्र त्या तुलनेत आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण खूपच कमी आहे. कायदा वा न्यायव्यवस्थाही आरोपींना शिक्षा का ठोठावू शकत नाही ? काय आहेत त्यातील अडचणी ? विवाहितेवर अत्याचार होत असला तरीही तो अगदी टोकाला गेल्यानंतरच पोलिसात तक्रार नोंदवली जाते. परंतु ही प्रकरणे खटल्याच्या पातळीला न पोहोचण्यासाठी बहुतांश वेळा अत्याचार झालेली विवाहिताच जबाबदार असते. अर्थात त्यात तिचा दोष नसतो, तर घरच्यांच्या भावनिक दबावाखाली येऊन ती तडजोड करायला तयार होते आणि गुन्हा मागे घेण्याची तयारी दाखवते. हुंडयाशी संबंधित सगळे गुन्हे हे 'नॉन कंपाऊंडेबल' आहेत म्हणजेच ही प्रकरणे निष्कर्षाप्रति नेऊनच निकाली काढावी नाहीत. म्हणून बऱ्याचदा अशा प्रकरणांमध्ये मुलीला खोटी साक्ष द्यायला सांगितला जाते. गैरसमजुतीतून तक्रार केली गेली, असा दावा केला जातो. पिडित स्त्रीच साक्ष उलटवत असेल वा खटला पुढे चालवण्यात आपण उत्सुक नाही. असे प्रतिज्ञापत्राद्वारे लिहून देण्यास तयार असेल तर दुसरा काहीही पर्याय उरत नाही. त्यामुळे तिचे म्हणणे नोंदवून घेऊन तिला बंडफितूर जाहीर केले जाते आणि पुराव्या अभावी आरोपीला निर्दोष मुक्तता करून प्रकरण निकाली काढली जाते.

५. लेखकाच्या मते, हुंडाबळी प्रकरणांबाबत सर्वात मोठी समस्या काय आहे?
   १) हुंडाबळी विषयक कायदे कठोर असले तरी त्यांमधून पळवाटा काढल्या जातात.
   २) कठोर कायदे करूनही हुंडाबळी प्रमाण म्हणावे तितके कमी झालेले नाही.
   ३) अशा प्रकरणांमध्ये शिक्षा होण्याचे प्रमाण कमी झाल्याने हुंडा प्रथेची तीव्रता वाढत आहे.
   ४) अशा प्रकरणांमध्ये कायदा व न्यायव्यवस्था अरोपींना शिक्षा करू शकत नाही.

---

६. हुंडाविषयक खटल्यांबाबत पुढील विधाने लक्षात घ्या. यातील कोणती विधाने उताऱ्यातील चर्चेच्या अनुषंगाने चुकीची आहेत?
   १) असे खटले दाखल होण्याचे प्रमाण ग्रामीण आणि शहरी भागात वाढत आहे.
   २) असे खटले न्यायालयाबाहेर तडजोड करून मागे घेता येतात.
   ३) काही खटल्यांमध्ये अपराध सिद्ध झाल्यावर आरोपींना मृत्युदंडही देण्यात आला आहे.
   ४) बहुतांश खटल्यांमध्ये तक्रारदार स्त्रियांवर खटला मागे घेण्यासाठी दबाव आणून तडजोड करण्यात येते.
   १) १, २, ३   २) २, ३, ४   ३) १, २, ४   ४) १ आणि ३

---

७. हुंडयाच्या मागणीबाबत तक्रार होऊनही आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण कमी का होत आहे ?
   १) कायद्यातील तरतुदींमधून तांत्रिक पळवाटा शोधून आरोपींची सुटका केली जाते.
   २) तडजोडीची तरतूद नसल्यामुळे विवाहिता दबावाखाली स्वत:च फितूर होऊन खटले मागे घेतात.
   ३) होणाऱ्या अत्याचारांची तीव्रता वाढेपर्यंत बराच कालावधी छळ सहन करत राहिल्याने विवाहितांवर भावनिक दबाव वाढत जातो.
   १) १, २, ३   २) १ आणि २   ३) २ आणि ३   ४) १ आणि ३

---

८. हुंडा प्रथेची कोणती कारणे उताऱ्यामध्ये नमुद करण्यात आली आहे ?
   १) हुंडा प्रतिबंधक कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करण्यात आलेले अपयश.
   २) भारतीय सामाजिक व्यवस्थेमध्ये स्त्रीला पुरूषांच्या तुलनेत दिलेले दुय्यम स्थान
   ३) आर्थिक विषमता आणि त्यातून निर्माण झालेली आर्थिक विवंचना गरज.
   १) १, २, ३   २) २ आणि ३   ३) १ आणि ३   ४) १ आणि २

---

**प्रश्न क्रमांक ९ ते १२ : खाली उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

भूपृष्ठाचा ७०% भाग महासागरांनी व्यापिलेला आहे. पर्यावरणात संतुलन, साधण्यात व परिसर सुस्थितीत ठेवण्यात महासागरांची महत्वाची मदत होते, परंतु याच महासागरात जगातील बहुतेक राष्ट्रे औद्योगिक अपशिष्टे, कचरा व अनुपयुक्त वस्तू टाकून ते प्रदूषित करतात. सागरी प्रदूषणामुळे पाण्यातील सर्वत्र दुर्गंधी पसरते, मासेमारीच्या धंद्यात अडथळे येतात. मनोरंजनासाठी समुद्रकाठाकडे येणारे हौशी लोक त्या बाजूला फिरकतही नाही. अनंत प्रकारच्या त्याज्य वस्तू समुद्रात फेकण्यात येतात. शहरवासीयांचे मलमूत्र व सांडपाणी, पडलेल्या इमारतींचे अवशेष, बांधकामांतून उरलेल्या दगडमातीचे ढीग, डबर, चिखल, गाळ, काही स्फोटक द्रव्ये, विविध प्रकारची रसायने व किरणोत्सर्गी अपशिष्टे, कीटकनाशके, कागदाच्या कारखान्यांतून व तेल परिष्करण कारखान्यांतून निघणारी त्याज्य द्रव्ये यांसारख्या वस्तूंमुळे समुद्र प्रदूषित होतो. कालवे, नद्यांची मुखे किंवा काही ठिकाणचा सागरी तळ साफ करताना जहाजांच्या सहाय्याने जो गाळ समुद्रात जाऊन पडतो त्याच्यामुळेच अधिकतम सागरी प्रदूषण निर्माण होते. त्यानंतर औद्योगिक अपशिष्टांचा क्रमांक लागतो. विषारी त्याज्य वस्तू जाड धातवीय दंडगोलात भरून ते दंडगोल समुद्रात बुडवितात. कधीकाळी ते फुटल्यास प्रदूषणाचा गंभीर धोका उद्‌भवण्याची शक्यता असते. अशा प्रदूषणाचा धोका टाळण्यासाठी त्याज्य वस्तूंवर पुन:संस्करण करून, त्यांतील उपयुक्त वस्तुकरण परत मिळवून अपशिष्टे निर्धोक व खऱ्या अर्थाने त्याज्य केल्यानंतरच ती समुद्राकडे वळविणे हा सागरी प्रदूषण थांबविण्याचा एकमेव मार्ग आहे. समुद्रात फेकल्या जाणाऱ्या अनेक घन वस्तूंचा उपयोग जमिनीवर रस्ते तयार करण्यासाठी किंवा जमिनीवरील खळगे बुजवून ती सपाट करण्यासाठी केला जाऊ शकतो. किनाऱ्यावरील ज्वलशनशील तेलाच्या टाक्या साफ केल्यामुळे व तेलवाहू जहाजे समुद्रावर भ्रमण करीत असताना फुटल्यामुळे विस्तृत प्रमाणावर तेल–प्रदूषण उद्‌भवते. अनेक मार्गांनी सागरपृष्ठावर दरवर्षी तेल पसरते. त्याच्या २० टक्के तेल एखादे मोठे तेलवाहू जहाज फुटल्यास समुद्रावर पसरते. पक्ष्यांना व सागरी जीवसृष्टीला अपाय पोहचविणाऱ्या अशा दुर्घटना टाळण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न करणे अगत्याचे ठरते. तेलाच्या टाक्या साफ करताना तेलमिश्रित पाणी समुद्रात पडू नय याबद्दलही दक्षता घेण्याचे आदेश अनेक राष्ट्रांनी आपापल्या शासनाला दिले आहेत. अनवधानाने समुद्रावर तेल सांडल्यास गवत, लाकडाचा भुसा

किंवा पॉलियुरेथेनाचा फेस सागरपृष्ठावर पसरून तैलनशोषण करता येते किंवा काही रसायने टाकून तेलाचे जेलीकरण किंवा घनीभवन करता येते. काही प्रक्षालके तैलपृष्ठावर टाकून किंवा त्वरेने पसरणाऱ्या तेलाला आग लावून तैल – प्रदूषण त्वरित थांबविता येते. तथापि यांतील बहुतेक मार्ग सागरी जीवसृष्टीला अपाय पोहचवितात. ते मार्ग अवलंबिवण्यापूर्वी सर्व बाजूंनी त्यांच्या परिणामांचा विचार करणे महत्वाचे असते. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर तेलाद्वारे होणारे प्रदूषण ही राष्ट्रीय समस्या मानून तीविरूद्ध उपाययोजना करण्याचे प्रयत्न चालू झाले आहेत.

९. समुद्रावरील तेल प्रदूषणाबाबत पुढीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे ?

१) तेल परिष्करण कारखान्यांतून निघणाऱ्या सांडपाण्यामुळे तेल प्रदूषण होते.
२) मालवाहू जहाजे फुटल्यामुळे सागरी तेल प्रदूषण होते.
३) किनाऱ्यावर ज्वलनशील तेलाच्या टाक्या साफ केल्यामुळे तेल प्रदूषण होते.
४) समुद्रावर होणाऱ्या तेल प्रदूषणामध्ये सर्वाधिक वाटा मोठे तेल वाहु जहाज फटल्याच्या दुर्घटनांचा आहे.

---

१०. सागरी प्रदूषणाची पुढील कारणे विचारात घ्या व त्यातील योग्य पर्याय निवडा ?

१) प्रक्रिया न करता त्याच वस्तू समुद्रामध्ये टाकून देणे.
२) समुद्रावर पसरलेल्या तेलाच्या थरास आग लावणे.
३) समुद्रकाठी पर्यटनासाठी येणाऱ्या हौशी लोकांच्या सवयी.
४) कालवे, नद्यांची मुखे या ठिकाणी होणारी मासेमारी

---

११. समुद्रावर होणाऱ्या प्रदूषणास आळा घालण्यासाठी पुढीलपैकी कोणते उपाय सुचविण्यात आले आहेत ?

१) घनकचऱ्याचा वापर रस्ते बनविण्यासाठी करणे.
२) समुद्रामध्ये टाकण्यापूर्वी त्याज्य पदार्थ पर्यावरणीय दृष्ट्या अपायकारक नसल्याची खात्री करू? न घेणे.
३) ज्वलनशील तेलाची वाहतूक समुद्रमार्ग न करणे.
४) तेलाद्वारे होणारे प्रदूषण ही राष्ट्रीय समस्या घोषित करणे.

१) फक्त १ आणि २ २) फक्त २ आणि ३
३) फक्त ३ आणि ४ ४) फक्त १ आणि ४

---

१२. समुद्रावरील तेलाच्या प्रदूषणावर कोणते उपाय सांगण्यात आले आहेत ?

१) धातूचे दंडगोलात प्रदूषित पाणी भरून ते समुद्रात बुडविणे.
२) लाकडाचा भुसा, पॉली युरेथिनचा फेरू समुद्रावर पसरून तेल शोषून घेणे.
३) तेलाच्या टाक्या साफ करताना, तेल मिश्रित पाणी समुद्रात न पडण्याची खबरदारी घेणे.
४) रासायनिक प्रक्रिया करून तेलाचे घनिभवन करणे.

१) फक्त १, २, ३ २) फक्त २, ३, ४
३) फक्त १, ३, ४ ४) वरीलपैकी सर्व

---

**प्रश्न क्रमांक १३ ते १६ : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

शेतकऱ्यांना भाताचा खोडवा जाळल्यामुळे निर्माण होणारे धुरके हे आपल्या गुदमरण्यामागचे प्रमुख कारण असल्याचे आतापर्यंत उत्तर–पश्चिम भारतातल्या प्रत्येकाला कळून चुकले आहे. वायू प्रदूषणामध्ये बरेच मोठे योगदान देणारे आणखीही काही घटक आहेत. एकदा प्रदूषण मेघ तयार झाला ही हवा जमिनीजवळ अडकते आणि सूर्यप्रकाशामध्ये अडथळा निर्माण होतो. हवा गरम होऊन प्रदुषके उंचावर घेऊन जाण्याची सामान्य प्रक्रिया थांबते. प्रदूषणाचे इतर महत्वाचे स्त्रोत नेहमीच अस्तित्वात आहेत आणि त्यावर तत्काळ उपायही उपलब्ध नाहीत. नेहमीप्रमाणे उपाय योजनेपेक्षा प्रतिबंध करणे जास्त व्यवहार्य असते. डिझेल ज्वलनामुळे प्रदुषण करणाऱ्या कणांची निर्मिती पेट्रोलपेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात होते. सध्या डिझेलच्या तुलनेत पेट्रोलचे दर २० टक्क्यांनी जास्त आहेत. नवीन डिझेल कारचे उत्पादन होऊ नये यासाठी केवळ पेट्रोलवरील कर कमी करणे डिझेलवरील कर वाढविणे हाच उपाय आवश्यक आहे जेणे करून किंमतीमधील फरक कमी होऊ शकेल. डिझेल करवसुली गरीबांसाठी अधिक प्रमाणात त्रासदायक ठरते हे मिथक आता पूर्णपणे दूर झाले आहे. (उदाहरणार्थ – 'इंधन कर आणि गरीब' या थॉमस स्टेंनेर यांच्या पुस्तकात) श्रीमंत आणि मध्यमवर्गीय लोकच वाहने खरेदी करतात आणि वस्तूही, मेरीलँड विद्यापीठाचा एक नवीन अभ्यास दाखवतो की चीनमध्ये गेल्या दशकात, सल्फर डायऑक्साइड ($SO_2$) प्रदूषण ७५ टक्क्यांनी घसरले आणि भारताचे $SO_2$ प्रदूषण ५० टक्क्यांनी वाढले. वातावरणात $SO_2$ चे रूपांतर धुरके तयार करणाऱ्या सल्फेट कणांमध्ये होते. चीनने कोळसा ऊर्जा प्रकल्पांवर $SO_2$ प्रदूषणाबाबत नियंत्रण घातले आहे. तर भारतामध्ये $SO_2$ नियंत्रित करण्याचे नियमन डिसेंबर २०१५ मध्ये निर्गमित करण्यात आले. आणि काही प्रकरणांमध्ये अंमलबजावणी सन २०२२ पर्यंत लांबविण्याची विनंती ऊर्जा मंत्रालयाने पर्यावरण मंत्रालयास केली आहे. बऱ्याच वेळेला 'जैसे थे' अवस्था काही गटांसाठी उपकारक ठरते. भारत सहा मानके २०२४ ऐवजी २०२० मध्ये लागू करण्यास काही ऑटो कंपन्यांनी विरोध केला. या विरोधात मागच्या हिवाळ्यामध्ये जनतेमध्ये बरच बारडाओरडा झाल्यावर याबाबत शासनाने कडक भूमिका घेतली. सर्व सरकारे त्यांच्याकडे केलेल्या मागणीस प्रतिसाद देतात. जोपर्यंत वायू प्रदूषणावर कारवाई करण्याची मागणी जनतेमध्ये मुखर होत नाही तोपर्यंत याबाबतची प्रगती मंदगतीनेच होईल.

१३. दिलेल्या उताऱ्यावरून खालीलपैकी कोणते अनुमान काढता येईल ?

१) भारताने आपल्या प्रदूषण नियंत्रणाचा वेग चीनच्या प्रयत्नाच्या वेगाइतका वाढवणे आवश्यक आहे.
२) सार्वजनिक दबावामुळेच भारतातील प्रदूषण नियंत्रणाची गती वाढेल.
३) भारतातील वायू प्रदूषण कमी करण्यासाठी भारत मानके वेळेत लागू करायला हवीत.
४) भारतात धुरके निर्माण होण्यामागे कित्येक अपरिहार्य कारणे आहेत.

---

१४. भारतातील वायू प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी पुढीलपैकी कोणते उपाय सुचवले जात नाही ?

१) शेतात तांदूळ पिकाचे अवशेष जाळणे थांबवणे.

२) भारत सहा मानके अंमलबजावणी शक्य तितक्या लवकर करणे.

३) पेट्रोलवर कर कमी करणे.

४) $SO_2$ नियंत्रण नियमांची अंमलबजावणी

---

१५. पेट्रोल कर कमी करण्यामागे कोणती समर्थने देण्यात आली आहेत ?

१) डिझेल ज्वलन पेट्रोलच्या ज्वलनापेक्षा जास्त प्रदूषणकारी आहे.

२) इंधनावर कर आकारणी गरीबांवर भारी पडते.

३) माल वाहतुक ही डिझेल वाहनांतून केली जाते आणि अशा वस्तू श्रीमंत किंवा मध्यम वर्गीयांकडूनच खरेदी केल्या जातात.

४) डिझेल कारचे उत्पादन टाळले पाहिजे.

१) १, २ आणि ३ २) १, ३ आणि ४ ३) २, ३ आणि ४ ४) वरील सर्व

---

१६. खालीलपैकी कोणते विधान खरे नाही ?

१) सुरूवातीला भारत सहा मानक सन २०२४ मध्ये लागू करण्यात येणार होते.

२) $SO_2$ उत्सर्जनावर नियंत्रणासाठीचे नियम भारतामध्ये पहिल्यांदा सन २०१५ मध्ये लागू करण्यात आले.

३) भारताच्या उत्तरेकडील भागात वायू प्रदूषणाच्या समस्येची तीव्रता वाढविण्यामध्ये हिवाळाही हातभार लावतो.

४) गेल्या दशकभरात भारताने सल्फर डाय ऑक्साईड प्रदूषण ५०% नी नियंत्रणात आणले आहे.

---

**प्रश्न क्रमांक १७ ते २० : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

सामाजिक बदलांची आपली अशी एक गती असतेच, पण त्या बदलांना साह्य करणारे आणि विरोध करणारे घटक एकाच वेळी काम करत असतात. ती एकूण प्रक्रिया बहुआयामी व गुंतागुंतीची असते. त्या प्रक्रियेचे काही इष्ट तर काही अनिष्ट परिणाम होतच असतात. परिणामी एकूण समाज, दोन पावले पुढे ये एक पाऊल मागे अशा पद्धतीने मार्गक्रमण करीत असतो, तुकडया तुकडयांनी पाहिले तर एकांगी चित्रच दिसण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे प्रचंड भयावह किंवा कमालीचे आशावादी असे चित्रही अधूनमधून दिसत असते. परंतु समग्रपणे पाहता येण्याची वृत्ती अंगी बाणावनली आणि भूत, वर्तमान भविष्य अशा काळाच्या संदर्भात त्या समग्रतेचे काही एक विवेचन – विश्लेषण करता आले तर समाजबदल समजून घेण्यासाठी ते जास्त उपयुक्त ठरते. तर असे समग्रपणे पाहता येण्यासाठी अनेक कसोटया सांगता येतील, परंतु समाजमनात खदखदणारे विषय कोणते आहेत, चर्चा कशावर चालू आहे, वाद–संवाद कोणामध्ये आणि कशावरून चालू आहेत याचा शोध घेणे ही एक कसोटी असते. या कसोटीवर चालू आहेत याचा शोध घेणे ही एक कसोटी असते. या कसोटीवर विचार केला तर असे लक्षात येते की काही विषय नव्याने चर्चेत, वादात येत असतात. पण काही विषयावरील चर्चा सतत या ना त्या स्वरूपात चालूच असते. अशा वेळी समाजस्पंदने ओळखणे अधिक कठीण वाटू शकते परंतु सतत चर्चेत असणाऱ्या विषयांची तीव्रता, घनता किंवा दाहकर्ता यांचे प्रमाण वाढते आहे की कमी होते आहे, हा उपनिकष तिथे लावता येतो. सध्याच्या काळाच्या संदर्भात उदाहरण देऊन सांगायचे तर गांधी आणि संविधान हे असे दोन विषय आहेत. ज्यांच्यावरील चर्चेच्या, वाद–संवादाच्या तीव्रतेची पातळी बरीच जास्त वाढल्याचे दिसते आहे. वैचारिक आदान–प्रदान सतत चालते अशी जी काही क्षेत्रे आहेत, त्यात राजकारण, सहित्य, संस्कृती (चित्रपट, नाटक व अन्य कला), शिक्षण यांचा समावेश प्रामुख्याने केला जातो. या सर्व ठिकाणी गांधी व संविधान या दोनही विषयांवर उलट – सुलट चर्चा चालू असते, अधूनमधून त्याला घमासान लढाईचे स्वरूप येते. परंतु काही वेळा अशा येतात की, गांधी व संविधान यांना दृश्यरूपात तितकासा तीव्र विरोध दिसत नाही. तरीही त्या दोन्हीचे समर्थक अधिक हिरीरीने काम करत असतात. जोरदार शक्तिप्रदर्शन करीत असतात. तसे करण्याची गरज त्यांना वाटते याचे कारण, गांधी व संविधान अडचणीत आले म्हणून नाही तर प्राप्त परिस्थितीत लढण्यासाठी तेच दोन आधार वाढतात. आजही स्थिती नेमकी अशीच आहे. गांधी व संविधान हेच आपले खरे आधारस्तंभ आहेत. असे देशभरातील अनेकांना वाटत आहे. या दोन स्तंभांना घट्ट धरून ठेवण्याची गरज त्यांना जास्त वाटते. याचाच एक अर्थ लोकशाहीचे चारही स्तंभ डळमळीत झाले आहेत अशी भावना त्यांच्या मनात बळावलेली आहे. आणि म्हणूनच कदाचित सर्व स्तरांवरून व सर्व माध्यमांतून अनेक लेख, पुस्तके, कार्यशाळा, भाषणे–व्याख्याने यांचा अक्षरशः मारा केला जात आहे, 'आदर्शासाठी गांधी आणि वास्तवासाठी संविधान यांना जवळ करा त्यांना ढाल करा, त्यांनाच शस्त्रही बनवा' असा हा प्रकार आहे. हे चित्र स्वागतार्ह आहे आणि चितांजनकी. अशी वेळ निर्माण झाली हे चिंताजनक, आणि अशा वेळी विचार जनसमूह गांधी व संविधान यांच्या अधिक जवळ जातो.

१७. समाजातील बदल समजून घेण्यासाठी लेखकाने कोणत्या पद्धती वापरण्याचा सल्ला दिला आहे?

१) इतिहास, वर्तमान आणि भविष्य या टप्प्यांचा समग्र विचार व अभ्यास स्वतंत्रपणे करावा.

२) समाजामध्ये ज्या विषयांवर सातत्याने विचार मंथन सुरू असते त्याचा मागोवा घ्यावा.

३) लोकशाहीचे स्तंभ डळमळीत झाले नाहीत ना खात्री करून घ्यावी.

४) समाजातील घडामोडींचे स्वतंत्रपणे न पाहता त्यांच्या एकत्रितपणे विचार करून समाजस्पंदने ओळखण्याचा प्रयत्न करावा.

१) १, २ आणि ३ २) २ आणि ४ ३) १ आणि ३ ४) २, ३ आणि ४

---

१८. गाधी आणि संविधान यांबाबत सुरू असलेल्या चर्चेबाबत लेखकाने मांडलेल्या विचारांतून पुढीलपैकी कोणते निष्कर्ष काढता येतील?

१) महात्मा गांधीचे विचार व संविधान यांचा प्रभाव क्षीण होत चालल्याने तो पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी या चर्चा सुरू झाल्या आहेत.

२) एकाच वेळी गांधी आणि संविधानाची गरज वाटणे याचा समाजावर अनिष्ट परिणाम होत आहे.

३) साहित्य, संस्कृती, शिक्षण, राजकारण अशा सर्वच स्तरांमध्ये गांधी आणि संविधान या विषयावर विचार मंथन सुरू असते.

४) वरीलपैकी एकही नाही

---

१९. समाजातील चर्चाविषयांच्या बाबत लेखकाने मांडलेल्या विचाराशी पुढीलपैकी कोणते विधान सुसंगत नाही?

१) या विषयांवरून समाजातील विचारप्रवाह समजून घेता येतात.

२) या विषयांवरून समाजाच्या विचारसरणीची दिशा व तिच्यातील बदल लक्षात येतात.

३) समाजातील बदलांचा समग्रपणे आढावा घेताना एक परीमाण म्हणून या विषयांचा अभ्यास व विश्लेषण उपयोगी पडते.

४) या विषयावरून सामाजिक बदलांची गती आणि तीव्रता समजून घेता येते.

---

२०. गांधी आणि संविधानाची तीव्रतेने गरज वाटणे हे लेखकाला समाजाबाबत चिंताजनक का वाटते ?

१) या विचारसरणींचा वापर संघर्षासाठी ढाल आणि शस्त्र म्हणून करण्याचा विचार बळावत आहे म्हणून.

२) लोकशाही पद्धतीचा ऱ्हास होत असल्यामुळे या विचारसरणींकडे परतावे लागले आहे म्हणून.

३) वर्तमानात इतर कोणताही आदर्श विचार आणि वास्तवदर्शी मार्गदर्शन उपलब्ध नसल्याने त्यांचा आधार घ्यावा लागत आहे म्हणून.

१) २ आणि ३ २) १, २ आणि ३ ३) १ आणि ३ ४) १ आणि २

---

**प्रश्न क्रमांक २१ ते २४ : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

मिल्टनने तीनशे वर्षापूर्वी लिहिलेल्या पत्रकापासून आजतागायत वृत्तपत्र स्वातंत्र्याचा अर्थ 'टिका आणि विरोध करण्याचे स्वातंत्र्य' हाच राहिलेला आहे. वैचारिक स्वातंत्र्यावर आज एक बाजूने एकाधिकारशाहीच्या समर्थकांकडून, तर दुसऱ्या बाजूने वृत्तपत्र व्यवसायातील मक्तेदारी व नोकरशाहीकडून हल्ला होतो आहे. अशा परिस्थितीत आपली वैचारिक निष्ठा जपू पाहणाऱ्या कुणाही लेखक/पत्रकाराची प्रत्यक्ष छळ वा दडपशाहीपेक्षा समाजव्यवस्थेच्या प्रवाहामुळेच जास्त अडवणूक होते. मूठभरांच्या हातात केंद्रित झालेल्या वृत्तपत्रे, रेडिओ व चित्रपट यांच्या मालकीचा सामना करतानाच त्याला पुस्तकांवर खर्च करण्याची इच्छा नसलेल्या वाचकजनतेच्या उदासीनतेमुळे चरितार्थासाठी थोडेफार विकाऊ असे कम अस्सल साहित्य लिहावेच लागते. आपल्याला दिसणारे पूर्ण सत्य सांगण्याऐवजी वरून आलेल्या आदेशानुसार विषय वस्तूवर काम करताना लेखक किंवा कलावंताचा 'दुय्यम दर्जाचा नोकरशहा' होतो. बऱ्याचदा आपण साहित्याचा अर्थ आणि साहित्यनिर्मितीची प्रक्रिया नीट समजून न घेता लेखकाला 'मनोरंजन करणारा कलावंत' किंवा प्रचारकी साहित्य 'ऑर्डर' प्रमाणे बनवून देणारा कारागीर समजतो सुमार लेखन सोडल्यास, साहित्य हा अनुभवाच्या मांडणीतून समकालीनांच्या दृष्टीकोनावर प्रभाव टाकण्याचा एक प्रयत्न असतो. असे कोणतेही साहित्य आजच्या काळात खऱ्या अर्थाने अराजकीय राहूच शकत नाही. कारण राजकीय व्यवस्थेशी निगडित भीती, द्वेष आणि बांधिलकी आपल्या जाणिवेच्या सर्वच स्तरांवर वास करीत आहोत. म्हणूनच अभिव्यक्ति स्वातंत्र्याच्या दृष्टीकोनातून पत्रकार आणि साहित्यिक यांच्याच फारसा फरक करता येत नाही. खोटे लिहिण्यास भाग पाडले किंवा महत्वाची बातमी लिहिण्यास मज्जाव केला तर जसे पत्रकाराचे स्वातंत्र्य हिरावून घेतले जाते तसे व्यक्तिगत भावना दडपाव्या किंवा मोडतोड करून व्यक्त कराव्या लागतात तेव्हा साहित्यिक आपले स्वातंत्र्य हिरावून घेतले जाते तसे व्यक्तिगत भावना दडपाव्या किंवा मोडतोड करून व्यक्त कराव्या लागतात तेव्हा साहित्यिक आपले स्वातंत्र्य गमावून बसतो. हे स्वातंत्र्य लैंगिकतेसंबंधी मुक्त पणे लिखाण करण्यापुरतेच मर्यादित नसून त्यात राजकीय मते मांडण्याचे स्वातंत्र्यही अंतभूत आहे. हुकूमशाही व्यवस्था विचारवंतावर दबाव आणत असतानाचे विचारवंतामधील स्वातंत्र्याची ऊर्मी कमकुवत होऊ लागल्यास गंभीर परिस्थिती निर्माण होते. वृत्तपत्र स्वातंत्र्य व भाष्ज्ञण स्वातंत्र्य यासंबंधीच्या चर्चेत मूळ मुद्दा असतो खोट्या गोष्टी खपविण्याचा, मात्र या स्वातंत्र्याची गळपेची करू पाहणारे हा प्रश्न सत्य विरूद्ध असत्य असा नव्हे तर शिस्त विरूद्ध व्यक्तिस्वातंत्र्य असा मांडतात. मुख्य म्हणजे, आपली मते विकायला नकार देणाऱ्या लेखक पत्रकारांवर अहंमन्यतेचा शिक्का मारतात. असेही युक्तिवाद केल जातात, की सत्य सांगण्याची ही योग्य वेळ नव्हे किंवा त्यामुळे कुणाच्या तरी हातात आयतेच कोलीत मिळेल. विचारस्वातंत्र्याचे रक्षण करताना जसा परंपरावाद्यांशी आणि धार्मिक कट्टरवाद्यांशी क्रांतिवाद्याशीही लढावे लागते. हुकूमशाही व्यवस्थेत पद्धतशीरपणे डावपेचांचा भाग नसून या व्यवस्थेचा अविभाज्य भाग असतात. एक वेळ ही व्यवस्था छळछावण्या आणि गुप्त पोलिसांशिवाय काम करू शकते. पण खोटयावर आधारित प्रचारयंत्रणेशिवाय ती चालूच शकत नाही. स्वत:ला सतत बरोबर सिद्ध करण्याच्या (जे प्रत्यक्षात कुणालाच शक्य नाही.) हुकूमशाही शासकांच्या गरजेतूनच चुका झाकण्यासाठी व काल्पनिक विजय दाखविण्यासाठी भूतकाळातील घटनांची पुनर्मांडणी आणि ऐतिहासिक व्यक्तीचे पुनर्मूल्यांकन केले जाते.

२१. अभिव्यक्ति स्वातंत्र्यामध्ये कोणत्या बाबी समाविष्ट होतात असे लेखक म्हणतो ?

१) पूर्ण सत्य मांडणे. २) व्यक्तिगत भावना दडपणे.

३) राजकीय मते मांडणे. ४) मते आणि भावनांची मोडतोड न करता मांडणी.

५) लैंगिकतेबाबत मुक्त लेखन

१) १, २, ३ आणि ५ २) १, ३, ४ आणि ५ ३) २, ३, ४ आणि ५ ४) १, २, ४ आणि ५

२२. पुढीलपैकी कोणते विधान हुकूमशाही व्यवस्थेचे वैशिष्ट म्हणून विचारात घेता येणार नाही ?
१) छळ छावण्या व गुप्त पोलिस
२) इतिहासाचे पुनर्लेखन
३) आक्रमक प्रचारयंत्रणा
४) ऐतिहासिक व्यक्तिंच्या तुलनेत स्वत:ला बरोबर सिद्ध करणे.

२३. उताऱ्याची मध्यवर्ती संकल्पना काय आहे ?
१) वृत्तपत्र स्वातंत्र्य व त्याचे महत्व
२) अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी
३) हुकूमशाही व्यवस्थेतील प्रचारतंत्र
४) साहित्यिकांचे दर्जा कमी होण्याची कारणे.

२४. लेखकाच्या मते सर्वाधिक चिंतेची बाब कोणती आहे?
१) लेखक किंवा कलावंताचा दर्जा घसरणे.
२) शिस्तीच्या नावाखाली अभिव्यक्ती स्वातंत्र्य नाकारणे.
३) विचारवंतांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आग्रह सोडून देणे.
४) परंपरावादी धार्मिक कट्टरतावादी व क्रांतीवादी यांचा अभिव्यक्ती स्वातंत्र्यास विरोध.

**प्रश्न क्रमांक २५ ते २८ : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

अशावेळी आम्ही काय करायचे विद्यापीठांत ? वाचायतो. भरपूर वाचायचो आणि वाचलेल्यावर प्रश्न विचारायचो. वाचलेलं ताडून बघायचो. वाचलेल्यापेक्षा प्रत्यक्ष वेगळं काही वाटलं तर हे असं का, असा प्रश्न आम्हाला पडायचा. त्याचं उत्तर मिळेपर्यंत आम्ही त्या प्रश्नाचा पिच्छा सोडायचोच नाही. के आमचं शिवणं होतं. वर्गात शिक्षक आणि विद्यार्थी अशा औपचारिक संबंधांतून जे दिलं जातं त्यापेक्षा हेकितीतरी मोठं होतं. एका अर्थी आमचं शिक्षण म्हणजे स्वत:ला चौकस ठेवण्याचा एक धडा होता. वाचायचं समजून घ्यायचं, प्रश्न विचाराचे उत्तर घ्यायची त्या उत्तरांवर प्रश्न विचाराचे, वाद घालायचे, जगातलं, कोणतंही तत्व पवित्र, अंतिम सत्य वगैरे नाही आणि कोणताही विचार अपवित्र, क्षणभंगुर वगैरे नाही ...... ही आम्हाला दिली गेलेली शिकवत होती. आम्ही विचार करायला हवा, प्रश्न विचारायला हवेत ...... यासाठी आम्हाला उत्तेजन देणारे आमचे शिक्षकच होते. उदारमतवाद आणि उदारमतवादांच शिक्षण म्हणजे काय ते आम्ही अनुभवलं. या काळात एक दिव्य विचाराचा साक्षात्कारच आम्हाला झाला. काळाच्या ओघात महान ठरलेला कोणताही विचार हा त्या काळातील प्रस्थापित विचारांशी व्यक्त केलेला मतभेद असतो. सॉक्रेटिसचे त्या वेळी होमरशी मतभेद होते. ॲरिस्टॉटल तर प्लेटॉशी भांडला होता. लॉक आणि हॉब्स यांच्यातही तीव्र मतभेद होते आणि रूसो तर या दोघांशी वैचारिक वाद घालायला आणि नित्शे कोणाशी भांडला नाही ? विटगेनस्टेन आयुष्यभर स्वत:शीच संघर्ष करत बसला. यातला एकही मतभेद वैयक्तिक नव्हता. तो राजकारणाच्या क्षुद्र संकल्पनेतून दिसणारा राजकीय वादाही नव्हता. यातले कित्येक वाद तर यातला एखादा निवर्तल्यनंतर दशकांनी, शतकांनी सुद्धा झालेत, पण यातली लक्षात घ्यायलाच हवी अशी बाब म्हणजे हे वद कधीही गैरसमजावर आधारलेले नव्हते. किंबहुना एखाद्या विचाराच्या पूर्ण आकलनानंतरच त्याबाबत मतभेद निर्माण होऊ शकतात. एखादा विचार इतका आत्मसात करायचा की तो उच्छ्वासातूनही बाहेर पडावा. याचा अर्थ असा की मतभेद व्यक्त करण्यासाठी ते मत आपण पहिल्यांदा समजून घ्यायचं. त्याच्या विचाराचं चिंतन, मनन करायचं आणि ते झालं की त्या विचारा आणि तो मांडणाऱ्याचा संपूर्ण सन्मान करीत पूर्ण आदबीनं मतभिन्नता मांडायची. ती मांडत असतानादेखील ज्या विचाराशी आपण मतभेद व्यक्त करीत आहोत तो विचार आपणास मान्य व्हावा यासाठी प्रतिवादाद्वारे प्रयत्न होऊ शकतो याचं भान बाळगायचं आणि त्यासाठी मनाचा मोकळेपणा कायम राखायचा. मतभेद हे आपल्या समाजाच्या प्रगतीचा आधारस्तंभ आहेत. 'मला मान्य आहे', असं म्हणणं ..... मग ते एखाद्या संघटनेचं सदस्यत्व असेल, राजकीय पक्ष, धार्मिक संघटनेचं म्हणणं असले ..... हे कोणत्याही समाजाच्या समुदायाच्या स्थिरतेसाठी आवश्यक असतं. पण 'मला मान्य नाही' असं सांगण्याची ताकद ही लोकशाही व्यवस्थेस स्थिरत्वाकडून प्रगतिपथावर नेण्यासाठी आवश्यक असते. या तीन शब्दात आपल्या दृष्टिकोनास विस्तारण्याची, सहिष्णुतेची पातळी वाढण्याची आणि बौद्धिक चैतन्य फुलवण्याची क्षमता असते. गॅलिलिओ, डार्विन, मंडेला असे अनेक जन 'मला मान्य नाही' या तीन शब्दांच्या क्षमतेनं मोठे झाले. पण आता मला मान्य नाही. असं म्हणायची ताकद आपण गमावून बसतोय का ?

२५. काळाच्या ओघात महान ठरलेल्या विचाराची लक्षणे कोणती ?
१) ते प्रस्थापित विचाराबाबतचे मतभेद म्हणून मांडले गेले.
२) ते राजकीय हेतूने पेरीत होते.
३) मूळ विचारांबाबतचे मतभेद वैयक्तिक नसले तरी त्यामागे बरेचदा गैरसमज कारणीभूत होते.
४) पूर्ण अभ्यासानंतरच हे विचार मांडण्यात आले.
१) १ आणि ३
२) २ आणि ४
३) २ आणि ३
४) १ आणि ४

२६. लेखकांच्या विद्यापीठातील अध्ययनाबाबत पुढीलपैकी कोणता पर्याय योग्य नाही ?
१) औपचारिक शिक्षण घेतानाच महान विचारवंतांच्या विचारांबाबत लेखकाच्या मनात मतभेद निर्माण झाले.
२) औपचारिक शिक्षणाबरोबरच लेखकाला उदारमतवादाचेही शिक्षण मिळाले.
३) कोणत्याही विचाराबाबत पूर्वग्रह न बाळगता त्याची पडताळणी करण्याची सवय बाणली गेली.
४) असहमती दर्शविण्याची आवश्यकता आणि योग्य पद्धती समजली.

२७. पुढीलपैकी कोणते विधान उताऱ्याच्या अनुषंगाने चुकीचे आहे ?
१) समाजाच्या प्रगतीसाठी प्रत्येकाने असहमती दर्शविणे आवश्यक आहे.
२) वैयक्तिक विकासासाठी प्रत्येक वेळी असहमती दर्शविणे आवश्यक आहे.
३) लोकशाहीच्या विकासासाठी काही जणांनी सहमती तर काही जणांनी असहमती दर्शविणे आवश्यक आहे.
४) विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना असहमती दर्शविण्याचे बळ दिले पाहिजे.
१) १, २ आणि ३
२) २ आणि ३
३) ३ आणि ४
४) २, ३ आणि ४

२८. शेवटच्या वाक्यातून लेखकाला अभिप्रत असलेल्या बाबी कोणत्या ?
१) असहमती दर्शविण्यासाठी साहसाची गरज असते.
२) असहमतीच्या माध्यामातून विकासाची वाट मोकळी होऊ शकते.
३) समाजामध्ये सहमतीचे प्रमाण वाढत आहे.
४) वरील सर्व

---

**प्रश्न क्रमांक २९ ते ३२ : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

मनुष्यस्वभाव हा सद्‌गुणांनी आणि दुर्गुणांनी युक्त आहे. पण तो बदलत जाणारा देखील आहे. मनुष्यस्वभाव असे सामान्यत: म्हटले तरी व्यक्तीगणिक वेगळेपण असतेच. एका आयुष्यातही व्यक्ती बदलत जाते. स्वभावात जनुकीय घटक असतात यात शंका नाही. पण पूर्णपणे जनुकनियतता असते हे अजिबाबत खरे नाही. सुरूवातीला इतरांनी केलेल्या आणि नंतर स्वत:च स्वत:वर केलेल्या संस्कारांचा घटक खूपच लक्षणीय प्रमाणात असतो. कशा दृष्टीने घेते यातून तिचा स्वभाव बदलू शकत असतो. मानवी आचरण हे पूर्णत: जनुकनियत तर नाहीच पण मेंदूनियतसुद्धा नाही. जनुके, संस्कार, कायदे पाळण्याची सक्ती, काय प्रतिष्ठेचे ठरेल याचा दबाव हे सर्व जमेस धरूनही आपल्याला स्व–घडवणूक शक्य असते. ह्युमन्स आर प्रोग्रॅम्ड टूबी सेल्फ प्रोग्रॅमेबल ! त्याच वेळी हे स्व–घडवणुकीचे स्वातंत्र्य अमर्याद नसते हेही आवर्जून ध्यानात घ्यायला हवे. कारण न झेपणारे निर्धार टिकत नाहीत. मानसिक उर्जा जितकी खर्ची पडते त्या मानाने आपण 'सुधारत' नाही. नेहमी अगोदरच्या विकासावरच पुढचा विकास अवलंबून असत आलेला आहे. कृतींना असलेला वाव अगदीच कुंठित असण्यापासून ते तो अधिकाधिक विस्तारत जाणे हे प्रगतीचे स्वरूप आहे. नैतिक व आत्मिक उन्नतीचे कोणते प्रकार प्रगतीच्या कोणत्या टप्प्यावर शक्य होतात? हे लक्षात घेऊनच उन्नती साधावी लागते. उदाहरणार्थ आरपार दुर्भिश असताना औदार्य तर सोडाच पण कर्तव्यनिष्ठाही उरत नाही आणि हिंसेवर उतरावे लागते, एवढे तरी मान्य केलेच पाहिजे. आदिमानव निर्माण होणे ही प्रक्रिया बराच काळ खर्ची पडूनच झाली आहे. म्हणूनच उत्क्रांती आणि (प्राक) इतिहास यांच्यात एक सामाईक प्रवास (ओव्हरलॅप) सुद्धा आहे. त्यात जनुकांचेसुद्धा काहीसे मानवीकरण झालेले आहे. टीमवर्क, फूड शेअरिंग आणि इतर टोळ्यांना भेटवस्तू ऑफर करून पाहणे, हे सद्‌गुण या संक्रमणात आपल्या जनुकांत पोहोचले आहेत. ही एक चांगली बातमी आहे. पण किती रानटीपणापासून सुरूवात झाली हे न पाहता, आपण फारसे सत्पवृत्त झाले नाही, असा निवाडा देणे हे स्वत:वरच अन्याय करणारे ठरेल. उत्क्रकांतीच्या प्रक्रियेविषयी पुरेशी स्पष्टता आपल्या मनात असायला हवी. जास्तीत जास्त काळ टिकून राहणारी जनुकेच आज जनुकसंचात उपस्थित आहेत. जनुके म्हणजे रसायने निर्माण करणारे छापे. जीवात योग्यवेळी योग्य रसायन निर्माण झाले तरच तो जीव टिकतो आणि पुनरूत्पादन करू शकता आणि तो करणारी जनुके टिकतात. टिकून राहणाऱ्या जनुकांची जिवाचे वर्तन नियत असते. यातूनच विविध जिवांमध्ये जीवनसंघर्ष चालू राहतो. या झुंजीतूनच त्यांच्यात परिष्कृतता (सोफेस्टिकेशन) वाढत जाते. मेंदू निर्माण होतात. जनुके आता थेटपणे निर्णायक ठरण्या ऐवजी जणू मेंदूशी करार करतात की, 'कसेही करा, पण आम्हाला जनुके म्हणून चालू ठेवा.' नंतर मेंदू जणू जाणिवांशी करार करतात की मला जे प्रतिक्षिप्तपणे करता येत नाही ते तुम्ही भवना–विचार या रूपात पुढे न्या.

२९. 'जनुकांचे मानवीकरण' या शब्द प्रयोगातून लेखकाला कोणता अर्थ अभिप्रेत आहे ?
१) मनुष्याला स्व घडवणूकीचे स्वातंत्र्य मिळणे.
२) उत्क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये जनुके परीष्कृत होत जातात आणि त्यातून माणसाची घडवणूक इतर सजीवांपेक्षा प्रगत पद्धतीने होते.
३) अन्नाची वाटणी, संघभावना आणि भेटी देणे या मानवी गुणांचे जनुकांमध्ये संक्रमित होणे.
४) मनुष्याच्या निर्णयाप्रक्रियेमध्ये जनुकांनी मेंदु आणि भावनांना अग्रस्थानी ठेवून आपली भूमिका मर्यादीत करणे.

---

३०. मनुष्याला स्वत:ची घडवणूक स्वत:च करता येते. कारण .........
१) माणसाचे आचरण कसे असावे हे केवळ त्याच्या जनुकांवर किंवा बुद्धीवर अवलंबून नाही.
२) संस्कार, सामाजिक, प्रतिष्ठ, कायदे यांच्या दबावाखाली वेगवेगळया लोकांचे आचरण वेगवेगळे असू शकते.
३) कोणत्याही गोष्टीचा अनुभव व्यक्ति कोणत्या दृष्टीकोनातून घेते त्यावरून तिचा स्वभाव घडतो किंवा बदलतो.
४) जनुकांपेक्षा बुद्धी व भावना मानवी कृतीमध्ये निर्णायक ठरतात.

| | |
|---|---|
| १) फक्त १, २ आणि ३ | २) फक्त १ आणि ३ |
| ३) फक्त २, ३ आणि ४ | ४) फक्त २ आणि ४ |

---

३१. लेखकाने मनुष्यस्वभावाबाबत केलेल्या विवेचनामध्ये पुढीलपैकी कोणती बाब अंतर्भूत नाही?
१) मनुष्यस्वभावाचा प्रवास रानटीपणापासून स्वप्रवृत्तीकडे असा झाला आहे.
२) मनुष्याचा स्वभाव जनुकनियत आणि मेंदनियत असतो.
३) मनुष्य स्वभावाची जडण–घडण अवलंबून असते ती केवळ त्यांच्या अनुभवाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनावर.
४) मनुष्याच्या स्वभावात एकाच वेळी विरोधी गुण अस्तित्वात असतात.

---

३२. जनुकांच्या कोणत्या महत्वाच्या भूमिकांबाबत या उताऱ्यामध्ये चर्चा करण्यात आली आहे ?
१) मनुष्य स्वभावाची जडण आणि सजीवांमध्ये आवश्यक त्या रसायनांची निर्मिती.
२) मनुष्य स्वभावाची गुणांचे संक्रमण आणि सजीवांच्या वर्तनाचे नियमन
३) विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर मनुष्य वर्तनाचे नियमन आणि उत्क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये सजीवांना टिकवून ठेवणे.
४) वरील सर्व

---

**प्रश्न क्रमांक ३३ ते ३६ : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

आपल्या लेखणी आणि वाणीतून डॉ. राधाकृष्णन यांनी भारतीय व पाश्चात्य तत्त्वज्ञानावर आणि इतरही अनेक विषयांवर मर्मग्राही भाष्य केले. ते शाश्वत मूल्यांचे भाष्यकार होते. विलक्षण दुर्बोध आणि गूढ तत्वचिंतनात्मक विचार अतिशय सोप्या भाषेत सांगण्याची हातोटी त्यांना लाभली होती. उथळपणा येऊ न देता सुबोध विवेचन करणे ही विद्वानांना क्वचितच साधणारी किमया त्यांनी करून दाखविली. ते तुलनात्मक तत्वाज्ञानाचे प्रवर्तक्र' म्हणून ओळखले जातात. 'वाघिणीचे दूध' पिऊन सुद्धा कागदी वाघ बनण्यापलीकडे अनेकांची मजल जाउ शकली नाही ! पण डॉ. राधाकृष्ण या प्रकारचे विद्वार नव्हते. यांनी पौरवात्य आणि पाश्चात्य तत्वज्ञानाचे अर्थपूर्ण तूलना केली. मनुष्य मुळात सर्वत्र सारखा असतो. या श्रद्धेवर ही तुलना आधारलेली होती. भारतीय दृष्टीतून पाश्चात्य तर पाश्चात्याच्या दृष्टीतून भारतीय कल्पना समजून घेण्याचे महत्व त्यांनी ओळखले. पाश्चात्य तर्कप्रधान भौतिक जीवनप्रणालीतील जीवनाचा अर्थ आणि भारतीय आध्यात्मिक विध्यारांमधील तर्कनिष्ठा त्यांना जाणवू शकली. भारतीय विचार त्यांनी इंग्रजी परिभाषेत मांडले. स्वामी विवेकानंद आणि रामतीर्थ यांच्यानंतर हिंदू धर्माची श्रेष्ठता पाश्चात्यांच्या नजरेला आणून देण्याचे प्रभावी कार्य डॉ. राधाकृष्णन यांनीच केले. ''पूर्व ती पूर्व आणि पश्चिम ती पश्चिम, दोघांची गाठ पडणे कदापीही शक्य नाही' अशी आंग्ल कवी रूडयार्ड किपलिंगची भविष्यवाणी डॉ. राधाकृष्णन यांनी खोटी ठरविली. 'पौर्वात्य आणि पाश्चिमात्यपर जे–जे काही उत्तम व उदात्त आहे ते–ते डॉ. राधाकृष्णन यांच्या ठायी आहे.'' अशा अर्थाचे उद्‌गार मँचेस्टर कॉलेजचे प्राचार्य जैक्स यांनी काढले. ब्रिटीश ज्ञानकोशकर्त्यांनी १४ व्या आवृत्तीसाठी भारतीय तत्वज्ञानावरचा लेख राधाकृष्णन यांच्याकडून लिहून घेतला. मंडालेच्या कारावासात असताना लोकमान्य टिळकांनी गीता आणि कांट यांच्याविषयीचा राधाकृष्णन यांचा लेख मागवून घेऊन गीतारहस्याच्या प्रस्तावनेत त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला होता.

३३. 'वाघिणीचे दूध' पिऊनसुद्धा कागदी वाघ बनण्यापलीकडे अनेकांची मजल जाऊ शकली नाही. याचा अर्थ सांगणारा सर्वांत योग्य पर्याय निवडा ?

१) 'बडा घर पोकळ वासा' असा त्यांचा प्रकार होता.
२) पाश्चात्य विद्येवर पोषण होऊनही ते वैचारिकदृष्ट्या सशक्त बनले नाहीत.
३) पाश्चात्य विद्येचे कातडे पांघरून ते अज्ञानीच राहिले.
४) पाश्चात्य विद्याविभूषित असूनही ते मनाने पूर्णपणे भारतीयच राहिले.

३४. डॉ. राधाकृष्णन यांचे कोणते वैशिष्ट्य उताऱ्यात नमूद केलेले आहे ?

१) टिळकपूर्व सखोल गीताभाष्य
२) शिक्षणविषयक मूलगामी तत्वचिंतन
३) पूर्व–पश्चिमेच्या संघर्षात्मक संवादाचा आविष्कार
४) क्लिष्ट तत्व विचारांचे दर्जेदार सरलीकरण

३५. डॉ. राधाकृष्णन यांच्या सखोल दृष्टीमुळे त्यांनी कशाचा मेळ घातला ?

१) उपनिषदे व पाश्चात्य अस्तितवाद
२) पाश्चात्य भौतिकवाद व भारतीय अध्यात्मवाद
३) पाश्चात्य विज्ञान व भारतीय अध्यात्म
४) पाश्चात्य परंपरेतील उत्तम व पौर्वत्य परंपरेतील उदात्य

३६. डॉ. राधाकृष्णन यांच्या कोणत्या कार्यावर उताऱ्यात विशेष भर दिलेला आहे?

१) हिंदू धर्म व गीतेचे प्रवचन
२) सुलभ शैलीतील लेखन
३) मूलगामी तत्वचिंतन
४) तुलनात्मक तात्विक भाष्य

**प्रश्न क्रमांक ३७ ते ४० : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

हे झालं आमच्या मोहोल्ल्याचं. हा बोलूनचालून आमचाच मोहोल्ला. बरं याचं जाऊ द्या. पण जिथं सुधारलेली वसती आहे. तेथेही हाच त्रागा. सरकार अनेकदा सक्तीचं करतं म्हणून नाइलाजानं लोकांनी घराभोवती जागा मोकळी सोडलेली असते. पण ती अशी बकाल असते ! सावत्र पोरासारखी तिची हेळसांड चाललेली. कोळसे, कचरा आणि अशाच कितीतरी बेवारस वस्तू ठेवण्याची हक्काची जागा असा त्या मोकळया जागेचा अर्थ ते लावतात. पाखरांची पिसं, सिगारेटची थोटकं, भाजीचे अवशेष काय–काय तरी तिथं पडलेले असते. हेही नसलं तर कुत्र्याच्या छत्र्या. गोखरू, गवत, छोत्रा असंच काहीबाही तिथं माजलेलं असतं. शहरी अंगण म्हणजे एक गंमतच झाली आहे. सुंदर हिरवळ राखली आहे. वेताच्या खुर्च्या टाकून मंडळी संध्याकाळी मजेत बसली आहेत, सकाळी एखाद्या लुसलुशीत कुत्र्याबरोबर खेळत एखादा बाळ तेथे हुंदडत आहे. आजोबा वृत्तपत्र वाचीत कोवळं उन्हे खात आहेत–असा देखावा अंगणाच्या वाट्याला फारसा येतच नाही. एखादं दुसऱ्या बंगल्याच्या वाट्याला तसं काही मनोहर रूप येतं. तिथली जागा तशी खऱ्या अर्थानं अंगण होऊन नटते. पण त्याही ठिकाणी त्या मोकळया जागेला अंगणाचं रूपड नसतंच. कसली तरी विलायती फुलावळ तिथं कागदी चेहऱ्यानं उभी असते. ऊन–पाण्यानं काळवंडलेला एखादा मुर्दाड झोपाळा तिथं बिनपोराच्या व्यथेत असल्यासारख्या स्वत:शीच झुलत असतो हिरवळ म्हणा, फर्निचर म्हणा, रोपटी म्हणा की मोठं छान रंगीत केलेले, तऱ्हेतऱ्हेच्या तुकडयांनी मढवलेले रस्ते म्हणा–सर्वांवर एक निर्जीव कळा असते. सगळं काही आखलेल बदिस्त असतं. जीवनाच्या खुणा, खेळकरपणाची कळा तशा त्या बंगलयाच्या आंगणावर नसते. एका कंपाऊंडी भिंतीचा उग घट्ट दरारा त्या जागेवर असतो. फाटकाजवळची जी कोण्या रावबहादूरची अथवा आय.ए.एस. नावाची पाटी त्या अंगणाच्या शोभेला बुरडी करून सोडते. त्यांनाही 'कुत्र्यांपासून सावध', 'येता–जाता फाटक लावून घ्यावे', 'कृपया घंटी दावावी'ए इत्यादी वाक्यांमुळं तर त्या अंगणाच्या डोळ्यांमधला स्वागताचा भावच ओसरून जातो. मग त्या सूचनांमधले 'कृपया' देखील खटकते. वास्तविक अंगण आणि घर हे एकच वास्तूचे अविभाज्य घटक आहेत. एकाच आईच्या दोन सख्ख्या लेकरांसारखं. जे घरात चालेल त्याची छाया अंगणावर पडायला हवी. पण तसं होत नाही. घरात रेडिओचे सूर निनादतात. कप–बश्यांचे व आग्रहांचे आवाज होतात आणि जिभल्या चाटणाऱ्या आधाशी कुत्र्याप्रमाणं अंगण वखवल्या तोंडानं 'आ' पसरून उभं असतं. घरातल्या गोड जीवनाला अंगण पारखं होतं. मुशाफरखान्यात दोन अपरिचित उतारू यावेत तसे एकत्र असूनही अंगण व घर एकमेकाला परके असतात. अंगणात पडलेल्या सूर्यकिरणांची दाद घराला नसते आणि घराला नसते आणि घरात घडणाऱ्या उत्सवी कळेचे काहीच अंगणाच्या वाट्याला

येत नाही. म्हणजे जेथे अंगण असते तेथेही हीच कळा. घरातल्या पोरी चित्रकलेचं प्रदर्शन करण्यासाठी दस्ताीार कागद खर्ची घालतील. काही कारण नसताना दिवाणखान्यात आपल्या कलेची जाहिरात व्हावी म्हणून मोर, हरणं, बदकं लावतील, पण अंगणात रांगोळीची रेघोटी ओढायला त्यांच्या जीवावर येतं. जिथं कलाप्रदर्शनाची ही दूरवस्था तिथं मग पावित्र्य व संस्कृती यांच्या रक्षणासाठी सकाळी 'राम'. 'कृष्ण' इत्यादी अंगणात लिहिणं तर कोसो दूर राहिलं. चाळींच्या अंगणाबद्दल विचारायलाच नको. इमारतींना वर्षानुवर्षे रंग नसतो आणि त्या वय गेलेल्या खप्पड दिसतात हे आहेच. त्यातून अंगण तर आणखीनच बेवारस, जवळ पैसा नसल्यामुळं किंवा तो अजूनही सरकारनं बंदी केल्यामुळं बांधता व आलेली जागा म्हणजे चाळीचे अंगण. त्यावर शेवाळ पसरणं. ते निसरडं राहण व घातमानाप्रमाणे धूळ. चिखल इत्यादी असणं हेच त्याचं नशीब

३७. नाइलाजाने लोकांनी घराभोवती जागा मोकळी सोडलेली असते, पण ती ....... असते.
१) सावत्र—आईसारखी २) सावत्र—बापासारखी
३) सावत्र—भावासारखी ४) सावत्र—पोरासारखी

३८. अंगणाच्या डोळयांमधला स्वागताचा भावच ओसरून जातो. असे लेखक का म्हणतात ?
१) कारण फाटक उघडे असते. २) कारण अंगणात कुत्रे बसलेले असते.
३) कारण फाटकावर 'कुत्र्यांपासून सावध'असे लिहिलेले असते. ४) अंगणात झाडे नसतात.

३९. अंगणात रांगोळीची रेघोटी ओढायला कोणाच्या जीवावर येते ?
१) पोरं व पुरूषांना २) घरच्या बायांना
३) घरातील आई—आजींना ४) घरातल्या पोरींना

४०. इमारतींना वर्षानुवर्ष रंग नसतो आणि त्या वय गेलेल्या ...... दिसतात.
१) माणसासारखी २) म्हाताऱ्यासारखी ३) खप्पड ४) वृद्धांसारखी

**Direction : Read the following passage carefully and answer the question give blow it.**

When we speak about atomic science or atomic technology, we cannot oreget it use on japan and the resultant suffereings and massive destruction it caused. However, except its destructive use, the filed, of atomic science-atomic technology is massive. It is different history when the science-technology of atomic energy saw light of the day. The theory of relativity was invented in the decade 1930. On this background, the mystery of atomic energy got revealed from the discovery of substance with large atomic weight. At the same time, the scientisits warned the world about the risk from reckless use of massive atomic energy relased. Immediately after this mechanism production of atomic energy by chain reactions in atomic reactors was discovered. During the same period, a yound man and returned to India after purshing engineering degree from Cambridge university. He was from a noble family. He had pursued engineering just because his father wanted him to do, in fact, he was interested in mathematics and physics. He was fully aware abut the research and subsequent development in atomic science. He was unable to go to cambridege for higher stdues due to world war II. Hence, he decided to work in India, that too with foundation of research institution. This young scientist in none other than legendary Dr. Homi Bhabha ! 'Atom bomb' is a product of aturmoil in atomic science – technology, thanks to world war II. Germany and America were at each other's throat but also contributing in the development of atomic science. The tehnology of atomic energy was misused in the enemity. The not only the destruction that the Japan experienced rendred makind speechless nad lost the faith in atomic science but in science itself. The world has stirred to the massive of atomic energy and its aftermath. This gave birth to a concept of 'use of atomic energy for peace'. Dr. Bhabha lead from the front in conceptualizing idea of peaceful use. The small plant of atomic science – technology planted by Dr. Bhabha year ago has become an elegant tree. Bhabha atomic research center, founded by Dr. Bhabha himself, has created self-identity for our nation and has become motherly institution to several institutions. All the atomic – related institutions are associated with this parent institution. You will find at least one scientist who has dedicated his life to the subject of science and technology ------ This highlight the scope of atomic energy. Today India is leading the world in some subjects associated with science – technology. Of course, credit goes to the foundation of atomic institution post – independence, in which atomic research center is at the forefront.

41. Which events occurred in science – technology field during World War II ?
a. The system of construction of Nuclear reactor was created
b. The idea of use of atomic energy for peace was developed.
c. Atom bomb was created
1) a, b and c 2) b and c 3) a and b 4) a and c

42. Which factors contributed to the discovery of nuclear Energy ?
a. Research in nuclear filed
b. Discovery of elements containing higher atomic weight.
c. Theory of relativity
d. Broad study in nuclear field except atom bomb
1) a, b and c 2) b, c and d 3) b and c 4) c and d

43. Which of the following statement is not appropriate about Dr. Bhabha's contribution in the filed of science and techinology ?
1) During World War II he decided to work in India instead of pursuing further studies at Cambridge.
2) He tried to establish the idea of peaceful use of nuclear energy.
3) he founded Atomic Research Instituiton in India after independence.
4) He pursued engineering from Cambridege Unviersity despite his liking for maths and physics.

**Directions : Read the following passage carefully and answer the questins given below it.**

The world is chaning rapidly. The intellectual journey of human curiosity is leading towards unusual welfare. Recently I came across an article has successfully producted proteins by using carbon and electricity. This is revolutionary event food production. Research like using hydrogen as fuel and pure drinking water will be its bi-produc is at the concluding stage. The research going on all over he world is meant for making human life easier. The main focus of these researches is with a thought that the basic needs of food, water and pure air should be available in abundance and quality. At the same time we as a species on this earth ae on a spree to finish each other and all ourselves. Afghanisthan, Syria, Cremia in the Ukrain, Iran, Saudi Arabia, North Korea, china sea can have the sparkle that will lead to the fire and at the end result into our extinction as a species. It is taken for granted that we human beings are one as species while making this stamen but this assumption is in danger now a days. some ccountries and people look down upon to be lesser human beings except their citizens. This has lead to the uncertainly about the future and the existence of making. In fact it has been totally impossible to predict anything. On this backdrop, time has come to revitalize our brotherhood and preserve or multilingual and multi-cultural geographical identity for deciding our behavior. We have a long tradition of tolerance. The ideology of considering Hindustance belongs only to Hindus on the lines of ameria is for Americans and Britain is for the British will insult the other religions, creeds and people having differnet belifes in India. People call india as Hindustant Become it is convenient for them. I have no objection calling India as Hindustan. But there are not only the Hindus who reside in India. There are Muslims, Christians, Parasis, Bouddhas, Sikhs and Jains also who have differnet beliefs. Even as Hindus we are not united. Have we open heartedly accepted Dalit brethren on equal footing in the society ? Or they are Hindus only to increase our percentage ? we have different indentities based on caste, customs and Languages. They can't be the matter of pride for us. This is a reality everywhere in the world. Even America does not have a unique American criterion. There are blacks and whites and whites. Hispanics, red Indians etc. Indias, Chines, Pilipino etc. are also accommodated there. The powerful America is in fact the product of the hard work of all these. Whatever has happened in America in the Modern age ahs been the reality for our country since thousands of years. Our country has rich tradition. The Christians, Muslims and people of other creeds are as Indias as wer Hindus thinks we are.

44. Which of the following findings can be drawn independently from the discussion in the given passage ?

a. It is wrong to display different indentities for the people living within the same geographical boundary.

b. The tendency of looking down upon other is growing in all communities.

c. The research to cater to the basic needs of human being is going on all over the world.

d. The activities to enhance and destroy the making are being done simultaneously.

1) a, c and d 2) b, c and d 3) a, b, and c 4) a, b and d

---

45. What equities in Amecrica and India has been put forth by the writer /

a. Citizens of both the countries preserve their independent identities.

b. The contribution of different community groups has led to the development of both the countries.

c. Foreiners settled have a significant share in the development of both countries.

d. A person different from one's one indentity is considered to be lesser human being in both the contries.

1) a, b, c, and d 2) a and b 3) b and c 4) c and d

---

46. Which places have been anticipated to be the reason behind the destructin of making ?


a. USA b. South Korea c. Crimea d. China

e. Afghanistan f. Syria

1) a, b, c and d 2) b, c and f 3) b, c, e and f 4) b, c and d

---

४७. खाली दिलेल्या आकृतीतील प्रश्नचिन्हांच्या जागी योग्य संख्या निवडा.




१) १२३ २) १३२ ३) १३७ ४) ९८

---

४८. एका कापड दुकानदाराने अर्धे कापड २०% नफ्याने उरलेल्या कापडापैकी अर्धे कापड २०% तोट्याने व उरलेले कापड खरेदी किंमतीला विकले तर या पुर्ण व्यवहारात शे. नफा किंवा तोटा किती ?

१) ना नफा ना तोटा २) ५% तोटा ३) ५% नफा ४) १०% नफा


---

४९. 'TUESDAY' या शब्दातील दोन स्वर व दोन व्यंजने घेवून शब्द तयार केल्यास असे एकूण किती शब्द तयार होतील?


१) ३६ २) ७२ ३) ६४ ४) ९२

---

५०. खालील आकृतीचे पाण्यात प्रतिमा कशी दर्शवेली जाईल ?



(A)



(a) (b) (c) (d)

५१. A, B, C, D आणि E हे P, Q, R, S आणि T ह्या शहरात राहतात. (वरील क्रमाने असतीलच असे नाही.) प्रत्येकजण वेगवेगळया शहरात राहतात.

१) B आणि C हे Q मध्ये रहात नाहीत. २) B आणि E हे P आणि R मध्ये रहात नाहीत.
३) A आणि C हे R, S आणि T मध्ये रहात नाहीत. ४) D आणि E हे Q आणि T मध्ये रहात नाहीत.

१) C हा P मध्ये राहतो. २) D हा R मध्ये राहतो.
३) A हा Q मध्ये राहतो. ४) B हा S मध्ये राहतो.

५२. विधान : जर तुम्हाला आमच्या कंपनीच्या न्यायालयीन खटल्याबद्दल काही शंका असेल तर आमच्या वकीलाशी संपर्क साधा

गृहीतके :

१) प्रत्येक कंपनीचा स्वत:चा वकील असतो.


२) कंपनीच्या वकिलाकडे या खटल्याबद्दलची पूर्ण माहिती आहे.

१) जर फक्त १ स्पष्ट असेल तर २) जर फक्त २ स्पष्ट असेल तर
३) जर दोन्ही गृहीतके स्पष्ट नसतील तर ४) जर दोन्ही गृहातके स्पष्ट असतील तर

५३. DEMOCRACY : YEDOMRCCA : : COMMUNISM : ?

१) MSINUMMOC 2) MOCMMNUSI
३) MUCNUMMSI ४) MOCMUNMIS

५४. खालील आकृतीत एकूण त्रिकोणांची संख्या किती आहेत ?



१) ४६ २) ४८ ३) ५२ ४) ५६

**पुढील माहिती वाचा.**

A + B म्हणजे A हा B चा मुलगा आहे.
A – B म्हणजे A ही B ची बायको आहे.
A x B म्हणजे A हा B चा भाऊ आहे.
A ÷ B म्हणजे A ही B ची आई आहे.
A = B म्हणजे A ही B ची बहीण आहे. तर ....

५५. P x R ÷ Q म्हणजे काय ?

१) P हा Q चा भाऊ आहे. २) P हे Q चे वडील आहेत.
३) P हे Q चे मामा आहेत. ४) Q ही P ची मुलगी आहे.

५६. जर १० एप्रिल २०१२ रोजी मंगळवार असेल तर १४ नोव्हेंबर २००९ रोजी कोणता वार होता ?

१) गुरूवार २) शुक्रवार ३) शनिवार ४) रविवार


५७. ५ वर्षा पूर्वी A व B यांच्या वयाचे गुणोत्तर ३:१ होते. ५ वर्षांनंतर त्यांच्या वयाचे गुणोत्तर ११:५ होईल तर A चे आजचे वय काढा.

१) २४ २) १३ ३) १५ ४) ३५

५८. खालीलपैकी किती वाजता घडयाळातील तासकाटा व मिनिटकाटा यामध्ये होणाऱ्या कोणाचे माप ७.५$^\circ$ असेल ?

१) ३.३० २) ९.३० ३) ८.४५ ४) १२.१५

५९.	खालील प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती आकृती येईल.




---

६०.	१ ते २० नंबरची तिकिटांच्या बंडलमधून एक तिकिट काढले तर त्या तिकिटाचा नंबर ३ किंवा ५ च्या पटीत असेल याची संभाव्यता किती ?

१) $\frac{1}{2}$		२) $\frac{2}{5}$		३) $\frac{8}{15}$		४) $\frac{9}{20}$

---

**सुचना : खालील माहिती वाचा व त्याखालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

एक शब्द व अंक व्यवस्थापन यंत्रास जेव्हा शब्द व अंकांची एक ओळ इनपुट म्हणून दिली जाते. त्यावेळी ते यंत्र त्या ओळीला एका पायरीत एका विशिष्ट नियमानुसार व्यवस्थित संयोजित करते. खाली इनपुट व संयोजनातील पायऱ्या यांचे एक उदाहरण दिलेले आहे.

इनपुट : 24 method 87 67 of data 34 collection 45 12 specified now
पायरी I : 12 method 87 67 of data 34 collection 45 specified now 24
पायरी II : 34 12 method 87 67 of data collection specified now 24 45
पायरी III : 67 34 12 method of data collection specified now 24 45 87
पायरी IV : collection 67 34 12 method of specified now 24 45 87 data
पायरी V : method collection 67 34 12 of specified 24 45 87 data now
पायरी VI : of method collectin 67 34 12 24 45 87 data now specified
आणि इष्ट व्यवस्था मिळाल्यामुळे पायरी VI ही या अनपुटची शेवटची पायरी आहे.
वरील पायऱ्यांमधील नियम ओळखा व त्यानुसार खालील इनपुटवर दिलेला प्रश्न सोडवा.
इनपुट : chemical 68 11 reaction 87 is 21 hard to 53 92 detect

६१.	शेवटच्या पायरीत उजवीकडून मोजल्यास '२१' हे कोणत्या स्थानी येतील ?

१) १० व्या		२) ८ व्या		३) ४ थ्या		४) ६ व्या


---

६२.	एक मुलगा वडिलांना शोधत आहे. तो आधी ९० मीटर पूर्वेकडे गेला, नंतर उजवीकडे वळून २० मीटर चालला. त्याचे काका दिसल्यामुळे तो उजवीकडे वळून ३० मी. चालला. शेवटी १०० मी. उत्तरेकडे चालून वडिलांपर्यंत पोहोचला. तर त्याच्या निघालेल्या जागेपासून तो किती मी. दूर आहे ?


१) ८० मी		२) १०० मी.		३) १४० मी.		४) २६० मी.

---

६३.	खालील आकृती पूर्ण करा.




(X)



१)		२)		३)		४)

---

६४. एका कुटुंबातील नात्यांचा संबंध ओळखा
एकूण ६ लोक आहेत – A, B, C, D, E, F
१) एकूण पुरूष हे स्त्रियांच्या, संख्ये एवढेच आहेत. २) A आणि E ही F ची मुले आहेत.
३) D ला २ मुले आहेत. मुलगा व मुलगी. ४) B हा A चा मुलगा आहे.
५) कुटुंबामध्ये सध्या एक विवाहित जोडपे आहे.
पुढीलपैकी कोणता संदर्भ बरोबर असेल ?
१) A, B आणि C सर्वच स्त्रिया आहेत. २) A हा D चा नवरा आहे.
३) D ही F ची नात आहे. ४) E ही F ही D ची नात आहे.

---

६५. एका वर्गात १५ मुले व १० मुली आहेत. त्यातून गणित ऑलिंपियाडसाठी ३ विद्यार्थी निवडायचे आहेत की ज्याच्यामध्ये १ मुलगी व २ मुले असावीत. तर किती पद्धतीने निवडता येतील याची संभाव्यता किती ?
१) $\frac{3}{25}$ २) $\frac{21}{46}$ ३) $\frac{1}{50}$ ४) $\frac{25}{117}$

---

६६. उभा रकाना । मध्ये काही नावे दिली आहेत. दुसऱ्या उभ्या रकान्यात ते सांकेतिक भाषेत लिहायचे आहेत. रकाना । वर रकाना ।। मधील अक्षरे एकाच क्रमाने असतील असे नाही. सांकेतिक भाषेचा अभ्यास करून प्रश्नातील शब्दांची सांकेतिक भाषा पर्यायामध्ये सुद्धा अक्षरे क्रमाने असतील असे नाही.

| । | ।। |
|---|---|
| VISHWAS | pbdabqf |
| MAINA | fgtfq |
| VISHVANATH | aeftfdabqd |
| SUHAS | fblab |

प्रश्न :– NAMITA = ?
१) tfgbef २) tfgdef ३) tfgatf ४) tfgqef

---


६७. एका शहरातील ३३% लोकांकडे रंगित दूरसंच आहेत. १८% लोकांकडे कृष्णधवल दूरसंच आहेत. दूरसंच असणाऱ्यांपैकी ५७% लोक दुरदर्शन पाहतात. त्यापैकी २५% लोक केवळ मनोरंजनासाठी. १९% लोक बातम्यासाठी तर १६% लोक शैक्षणिक उपयोगासाठी दुरदर्शन पाहतात. उर्वरीत ३४८८४ लोक कोणत्याही खास उद्देशाशिवाय दूरदर्शन पाहतात तर त्या शहराची एकूण लोकसंख्या किती ?
१) २८४००० २) ४३५००० ३) ३००००० ४) १८७९५०

---

६८. एक व्यक्ती मंदिरात पुजेसाठी जात असताना त्याने प्रत्येक पायरीवर पायरीच्या क्रमांकाइतकी फुले ठेवली. देवाला २१ फुले वाहिली. तरीसुद्धा त्यांच्याकडे ५ फुले शिल्लक राहिली. जर मंदिराला ५० पायऱ्या असतील. तर त्या व्यक्तीजवळ किती फुले होती.
१) १२७५ २) १००५ ३) १३०१ ४) १५०५

---

६९. पुढील आकृत्यांचे निरीक्षण करा.
सात महाविद्यालये आहेत – A, B, C, D, E, F आणि G




प्रश्न :– वरील आकृतीनुसार महाविद्यालय F मध्ये पदव्युत्तर व पदवीसाठी असलेल्या मुलांचे गुणोत्तर काय असेल ?
१) १४:१९ २) १९:२१ ३) १७:२१ ४) १९:१४

७०. एक विमान ११०० किमी / तास या वेगाने प्रवास करून शकते जेव्हा त्याला हवेचा विरोध नसतो. हवा पूर्व ते पश्चिम दिशेने १०० किमी / तास या वेगाने वाहते. विमानाला परतीचा प्रवास पूर्ण करण्यास, मुंबई ते दिल्ली करण्यास किती वेळ लागेल ? मुंबई आणि दिल्ली शहरांमधील अंतर हे अंदाजे ४८०० कि.मी. आहे. (मुंबई हे पश्चिम दिशेला तर दिल्ली पूर्व दिशेला आहे.)

१) ४.५ २) २ ३) ८ ४) ८.८

---

७१. $(25)^{7.5} \times 5^{2.5} \div (125)^{1.5} = 5^x$ तर x ची किंमत किती ?

१) १० २) १३ ३) १७ ४) १५.५

---

७२. खालील अक्षरमालिकेत काही अक्षरे वगळली आहेत. वगळलेली अक्षरे योग्य त्या अनुक्रमाने चार पर्यायांत दिलेली आहेत. यांतील बिनचुक पर्याय शोधून काढा.

p_xrg _ _ wxr _ mpw _ _ gm

१) gmwxrp २) wmpgxr ३) pwxgmr ४) xgwprm

---

७३. Y म्हणजे भागाकार, X म्हणजे वजाबाकी, K म्हणजे बेरीज करणे आणि Z म्हणजे गुणाकार करणे तर पुढीलपैकी कोणते समीकरण बरोबर आहे ?

१) 6Y3X2Y5 = 0.5 २) 726K12 = 21

३) 15X45Y9Z2 = 5 ४) यापैकी नाही.

---

७४. १० मजूर, काम क्र. १ हे १० दिवसात, तर काम क्र. २, ५ दिवसात संपवतात. जर काम क्र. १ वर ५ मजूर व काम क्र. २ वर १० मजूर कामाला लावले, तर दोन्ही कामे संपण्यास एकूण किती दिवस लागतील ?

१) २२.५ २) १५ ३) १२.५ ४) २५

---

७५. १२ से.मी. बाजू असलेल्या घनाकृती ठोकळयाचे प्रत्येकी १ से.मी. बाजूचे छोटे घनाकृती ठोकळे तयार केल्यास एकूण किती ठोकळे तयार होतील व मूळ ठोकळा किती वेळा कापावा लागेल ?

१) १७२८, ३३ २) १७२८, ३० ३) २५६, १५ ४) १२९६, ३०

---

७६ तुम्ही राहत असलेल्या भागातील रस्त्यांची स्थिती दयनीय झाल्या कारणाने त्याची दुरूस्ती करण्यासाठी तुम्ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वेळोवेळी तक्रार देऊनसुद्धा रस्त्यांची दुरूस्ती झालेली नाही. अशावेळी तुम्ही माहितीच्या अधिकारानुसार (RTI) या संदर्भातील माहिती जेव्हा मागवता तेव्हा असे लक्षात येते की कार्यालयीन कागदपत्रांमध्ये त्या रस्त्यांची दुरूस्ती झाल्याचे म्हटलेले आहे व त्यासंदर्भातल्या कामाची रक्कम ठेकेदाराला देण्यात सुद्धा आलेली आहे. तुम्ही त्यानंतर कार्यकारी अभियंत्यांना ह्या संदर्भातली चर्चा करण्यासाठी भेटण्याची वेळ मागितल्यानंतर ते भेटायला टाळाटाळ करीत आहे. ह्या सर्व घडामोडी घडत असताना ठेकेदार तुमच्याकडे येतो व तो तुम्हाला या प्रकरणातून लक्ष काढून टाकण्याची धमकी देत आहे व तुमच्या घराच्या आसपासचा रस्ता करून दिला जाईल असे सांगतो अशावेळी .....

१) कार्यकारी अभियंता आणि ठेकेदार यांच्याविरूद्ध लेखी तक्रार दाखल कराल.

२) शांत राहून ठेकेदाराने तुमच्या आजूबाजूला रस्ता करून देण्याचे त्याचे आश्वासन स्वीकाराल.

३) स्वत: पुढाकार घेऊन तुमच्या आजूबाजूच्या लोकांना एकत्र करून सामुदायिक तक्रार शासकिय यंत्रणा आणि ठेकेदार यांच्याविरूद्ध दाखल कराल.

४) स्वत:चे घर सोडून नवीन भागात राहायला जाल.

---

७७. तुम्ही एका 'नवरत्न' दर्जा असणाऱ्या कंपनीच प्रमुख म्हणून काम करीत आहात. त्या कंपनीत एका, दुर्देवी अपघातात एक कर्मचारी काम करीत असताना मृत्युमुखी पडला कंपनीतील सुरक्षा तसेच सावधानीच्या सुविधा निकृष्ट दर्जाच्या असल्याने हा अपघात घडला. आता कामगार संघटनेने संप पुकारला असून उत्पादन चालू ठेवणे तर गरजेचे आहे. अशा वेळी तुम्ही कोणता तोडगा काढाल ?

१) तुम्ही कामगार संघटनाना आश्वासन द्याल की योग्य ती खबरदारी घेण्यात येईल आणि त्याचबरोबर तुम्ही इतर युनिट्सच्या माध्यमातून काम करवून घेवून उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न कराल.

२) तुम्ही कामगार संघटनांशी वाटाघाटी कराल व त्यांना आश्वासन द्याल की योग्य ती सुरक्षेची खबरदारी घेतली जाईल. तसेच अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या कर्मचाऱ्याला योग्य तो मोबदला दिला जाईल याचीही ग्वाही तुम्ही द्याल.

३) तुम्ही एक सुरक्षेच्या उपायांची पाहणी करण्यासाठी व उपाययोजना सूचवण्यासाठी एका समितीचे गठन कराल.

४) तुम्ही एक समिती नेमाल व हे जाणून घ्यायचा प्रयत्न कराल की दुर्घटना कर्मचाऱ्याच्या निष्काळजीपणामुळे तर नाही झाली !

---

७८. तुम्हाला एक अनधिकृत झोपडपट्टी हटवण्याची जबाबदारी देण्यात आलेली आहे आणि त्यामुळे तिथला जमाव प्रचंड प्रमाणात प्रक्षुब्ध झालेला आहे अशावेळी लोकांचा राग कमी होण्यासाठी व तुम्हाला दिलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी काय कराल ?

१) लोकांशी बोलणी/चर्चा कराल.

२) त्या भागातील लोकांच्या प्रमुखाशी/ नेत्याशी चर्चा कराल.

३) जादा सुरक्षा बंदोबस्ताची मागणी कराल.

४) झोपडपट्टी हटाव मोहिम थोड्या कालावधीसाठी थांबवाल व लोकांचा राग शांत होऊ द्याल.

---

७९. एखाद्या ठिकाणी मशीद / मंदिर पाडण्याचा प्रयत्न जमावाकडून करण्यात येत आहे अशावेळी तुम्ही DM / SP म्हणून काय कराल ?

१) तुमच्याजवळ असणाऱ्या सर्व फौजफाटयाचा / जवानांचा वापर करून हे कृत्य करण्यापासून जमावाला थांबवाल.

२) ही एक राजकीय घटना असल्याने मुख्यमंत्र्यांना त्याबाबतची माहिती द्याल व त्यांच्या आदेशानुसार वागाल.

३) जमावाच्या नेत्याशी बोलणी कराल.

४) तुम्ही एक धर्मनिरपेक्ष व्यक्ती आहात व त्यामुळे जोवर रीतसर तक्रार दाखल केली जात नाही तोपर्यंत कोणतीही कार्यवाही न करता थांबाल.

---

८०. तुम्ही भारत सरकारच्या एका विभागात उपायुक्त म्हणून काम करत आहात व एका पदाच्या भरतीसाठी लेखी परीक्षेद्वारे उमेदवारांची निवड करण्याची जबाबदारी तुमच्यावर सोपवण्यात आलेली आहे. चाचणीद्वारे १० उमेदवारांची निवड केवळ दोन पदांसाठी झालेली आहे. यामध्ये तुम्हाला उमेदवाऱ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेची तसेच त्याच्या कामाच्या यापूर्वीच्या अनुभवाचा विचार तुम्हाला करायचा आहे. अशावेळी तुमचा उच्चपदस्थ अधिकार 'क्ष' व्यक्तीची निवड व त्याचा विचार दोनपैकी एका जागेसाठी व्हावा यासाठी सुचवत आहे अशावेळी

१) या संदर्भातली माहिती तुमच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला कळवाल.

२) तुमच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्याची मर्जी राखण्यासाठी व त्याने केलेल्या विनंतीचा मान म्हणून त्या उमेदवाराची निवड कराल.

३) दहाही उमेदवारांच्या गुणवत्तेच्या व अनुभवांचा अभ्यास करून दोन पदे भराल. मग त्यानुसार 'क्ष' निवड होत असेल तरी चालेल.

४) भ्रष्टाचाराचा आरोप टाळण्यासाठी 'क्ष' ची कोणत्याही परिस्थितीत निवड करणार नाही.

---